## प्रेसनोट

दि. २४/०६/२०२५

अॅन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून अनंतराव पवार औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माळेगाव, ता. बारामती येथील उपप्राचार्यावर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ३३ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. अवधूत भिमाजी जाधवर, वय ५३ वर्ष, पद - उपप्राचार्य (अति.कार्यभार- प्राचार्य) अनंतराव औद्योगिक प्रशिक्षण संस्था माळेगाव, बारामती, जि. पुणे. (वर्ग-१) राजपत्रित) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ८०,०००/- (ऐंशी हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ४०,०००/- (चाळीस हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ४०,०००/- (चाळीस हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | २३/०६/२०२५ |
| सापळा दिनांक | २४/०६/२०२५ |
| ठिकाण | हॉटेल सिटी इन, बारामती, जि. पुणे |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. अमोल भोसले, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९५२७३१७५२७) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे खाजगी पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष असून त्यांचे इन्स्टिट्यूटकडून घेण्यात येणा-या चालू वर्षाच्या परीक्षेकरिता ४५ विद्यार्थी बसलेले आहेत. सदर परिक्षेकरीता शासकीय औद्योगिक शिक्षण संस्था माळेगाव बारामती यांच्याकडून त्यांच्या नेमणुकीतील परीक्षा पर्यवेक्षक नेमले जातात. लोकसेवक अवधूत जाधवर हे अनंतराव पवार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था माळेगाव येथे उपप्रचार्य या पदावर कार्यरत असून सध्या त्यांच्याकडे प्राचार्य या पदाचा सुद्धा अतिरिक्त कार्यभार आहे. तक्रारदार यांनी अनंतराव पवार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस पत्र देऊन त्यांच्या पॅरामेडिकल संस्थेच्या परीक्षेकरिता पर्यवेक्षक नेमण्याची मागणी केली होती. त्याप्रमाणे प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार असलेले लोकसेवक अवधूत जाधवर यांनी तक्रारदाराकडे त्यांच्या संस्थेची चालू वर्षातील परीक्षेसाठी पर्यवेक्षक नेमण्यासाठी आणि ती परीक्षा सुरळीत पार पाडून देण्यासाठी तक्रारदाराच्या संस्थेच्या परीक्षेत बसणा-या एका विद्यार्थ्यासाठी २००० असे ४५ विद्यार्थ्यांसाठी एकूण ९०,०००/- रुपयाची लाचेची मागणी करून त्या रकमेपैकी १०,०००/- रुपये तक्रारदाराकडून अगोदरच घेतले व नंतर लोकसेवक यानी पर्यवेक्षक नेमण्याचे पत्र तक्रारदारास दिले. त्या पत्राप्रमाणे पर्यवेक्षक येऊन तक्रारदाराच्या संस्थेतील परीक्षा सुरू झाली. त्यानंतर परीक्षा सुरु असताना लोकसेवक अवधूत जाधवर यांनी उर्वरित ८० हजार रुपयांच्या लाच रकमेसाठी तक्रारदाराच्या पाठीमागे तगादा लावत असल्याची तक्रार तक्रारदाराने दि. २३/६/२०२५ रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे, येथे तक्रार दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. २३/०६/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक अवधूत जाधवर, उपप्राचार्य (अति.कार्यभार - प्राचार्य) यांनी तक्रारदाराकडे त्यांच्या पॅरामेडिकल संस्थेमध्ये घेण्यात येणा-या परीक्षेकरिता पर्यवेक्षक नेमण्याच्या बदल्यात तसेच परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी तसेच परीक्षेदरम्यान काहीही अडचण न आणण्याकरिता तक्रारदार यांच्याकडे सुरवातीस ८०,००० रुपयांची लाच मागणी करून तडजोडीअंती ४०,००० रुपयाची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.

आज दि. २४/०६/२०२५ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये, लोकसेवक अवधूत जाधवर, उपप्राचार्य (अति.कार्य. प्राचार्य) अनंतराव पवार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था माळेगाव यांनी तक्रारदाराच्या वरील कामासाठी 'हॉटेल सिटी इन' बारामती येथे तक्रारदाराकडून ४०,००० रुपयाची लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, लोकसेवक अवधूत जाधवर यांचेविरुद्ध बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शितल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

२४/६/२५

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सत्यमेव जयते

Scanned with CamScanner